# ई साहित्य : एक ओळख

तसं पहाल तर बदल हा जीवनाचा स्थायी भाव आहे. जीवन सतत बदलत असतं. माणसं बदलतात. सभोवतालच्या वस्तू बदलत असतात. निसर्ग बदलत असतो. भाषा बदलत असते. आवडीनिवडी बदलत असतात. फ़ार कशाला? विचारही बदलत असतातच की. एकजागी काहीच रहात नाही. सतत बदल होतच असतो. पण रोज रोज सूक्ष्मपणे होत असणारे हे बदल कधी संथ असतात तर काळाच्या काही टप्प्यांत अत्यंत वेगाने होतात आणि सगळयाचीच उलथापालथ होते. उदाहरणार्थ , मूल रोजच मोठं होत असतं हे खरं. पण रांगायला लागणं, चालायला लागणं असं करत करत SSC, HSC  सारखे टप्पे , किंवा नोकरी, लग्न यांसारखे टप्पे त्याचं आयुष्य एका रात्रीत माणसाला संपूर्णपणे बदलतात. निसर्ग रोज हळू हळू बदलत असतो. पण जेव्हा पहिला पाऊस पडतो तेव्हा पावसाळा आल्याची चाहूल लागते. सामाजिक बदलांचेही असेच महत्त्वाचे टप्पे असतात.

शिकारीवर उदरनिर्वाह करणारी मानवजात टोळी करून गुहेत रहात असे. आणि प्राण्यांची शिकार मिळेल तेव्हा स्वतःचे पोट भरत असे. हा पहिला टप्पा. जेव्हा शेतीचा शोध लागला, तेव्हा त्यांनी गांवं वसवली. पोटापाण्याची चिरस्थायी सोय केली तसे त्याचे पूर्ण आयुष्यच बदलले. रानटी आयुष्य टाकून संस्कृती निर्माण केल्या. घरं, कुटुंबं, संपत्तीची मालकी, पशूपालन असं सगळं येत गेलं. पण यातही त्याच्यावर निसर्गावर अवलंबून रहाण्याची पाळी होती. हा दुसरा टप्पा होता. नंतर जेव्हा औद्योगिक क्रांती झाली तेव्हा कारखाने आले. शहरांची निर्मिती झाली. मोठमोठे उद्योग उभे राहिले. बॅंका, युनिव्हर्सिटीज वाहतूक व्यवस्था बदलली.  संपत्तीची व्याख्या बदलली. हा तिसरा टप्पा होता. बघता बघता या तीन टप्प्यांत माणसांनी संपूर्णतः वेगवेगळया जीवनपद्धतींचा स्वीकार केला. याचा अर्थ शिकार करणाऱ्या

टोळया संपल्या असं नाही. कारखाने आल्यावर शेती बंद झाली असंही नाही. पण जीवनपद्धती बदलली.

अगदी अशाच प्रकारचा आमुलाग्र बदल भाषा, साहित्य आणि एकूणच कम्म्युनिकेशनच्या क्षेत्रात होत गेला. भाषा आणि साहित्य यांची निर्मिती मानव अत्यंत आदिम काळापासून करत आला आहे. भाषा हे संपर्काचं साधन होतं. त्यात घटनांची नोंद करणं, नवीन कल्पना आणि काल्पनिक जीवनाचं वर्णन, महाकाव्यं, धार्मिक आणि कार्मिक साहित्य, गीतं, अशी अनेक प्रकारची निर्मिती मुख्यतः मौखिक पद्धतीने होतच होती. शिलालेख, भित्तीचित्रं, लेणी, पिरॅमिड आदि स्वरूपांत ही निर्मिती नोंदवलीही गेली. एकमेकांशी बोलण्यासाठी भाषांचा वापर तर झालाच. प्रवासी व जगभर फ़िरणारे व्यापारी यांच्या मार्फ़त भाषांची देवाणघेवाण जगभर होत होती. नंतर भूर्जपत्रं , ताम्रपत्रं आदींवर लिखाण होत होते. हे लिखाण लिहीणे जितके कष्टाचे तितकेच ते मिळवून वाचणेही कष्टाचे होते. या काळांत सार्वत्रिक शिक्षण वगैरेंचा विचारही नव्हता.  सगळेच अत्यंत मर्यादित होते. पुढे जाता कागदाचा शोध आणि हस्तलिखितांच्या माध्यमातून थोडाफ़ार अधिक प्रसार शक्य झाला. पण खरी क्रांती आणली ती छपाईनेच. मुद्रणकलेचा शोध हा साहित्य आणि ज्ञानाच्या सार्वत्रिकतेचा पाया ठरले. एका खंडातील माहिती दुसऱ्या खंडात आणि एका काळातील माहिती दुसऱ्या पिढीत सहजपणे उपलब्ध होण्याला मदत झाली. लाखों कोट्यवधी पुस्तकांची निर्मिती , वाचनालये, सार्वत्रिक शिक्षण, साहित्यातले प्रयोग ही या काळाची वैशिष्ट्ये होती. वर्तमानपत्रे आणि नियतकालिकांनी तर जग अक्षरशः पिंजून काढलं. पुस्तकांनी जगभरच्या मानवांची ज्ञानाची भूक एकीकडे भागवली तशीच दुसरीकडे चाळवलीही.

ई साहित्य हा साहित्याचा प्रकार नाही. हे साहित्याचं माध्यम आहे. एखादं गाणं घरातल्या घरात म्हणणं, हॉलच्या स्टेजवर म्हणणं, सिडी मध्ये रेकॉर्ड करणं आणि टिव्हीवर प्रसारित होणं यात ते गाणं तेच रहातं. पण माध्यम बदलल्यामुळे त्याचं वजन बदलतं. त्याची परिणामकारकता बदलते. त्याचे श्रोते बदलतात. आणि त्यामुळे त्याची क्वालिटीही बदलते. ऐकणारे जितके जास्त तितकं माणूस काळजीपूर्वक गातो,

तयारीने गातो. म्हणजे माध्यम बदललं की साहित्याची क्वालिटी बदलते. पण हे ई साहित्य म्हणजे काय ?

गोष्टी सांगणं(आणि ऐकणं), माहिती देणं (आणि घेणं) या माणसाच्या आदिम गरजा आहेत. त्यातूनच भाषांचा जन्म झाला. त्या वाढल्या. परिपक्व झाल्या. त्या लिखित स्वरूपात आल्या. भिंतीवर, गुहांत, दगडांवर शब्द आले. मग भुर्जपत्रांवर आले. नंतर कागद आला. आणि दोन शतकांपूर्वी छापखाना आला. छपाई तंत्र आलं. आणि इतकी वर्षं जपून ठेवलेलं साहित्य जगभरात पसरलं. अरेबियन नाईट्स भारतात आल्या. महाभारत युरोपात गेलं. ज्ञानप्रसाराचा वेग प्रचंड वाढला. एके काळी जगात एक टक्का लोकांनाही लिहिता वाचता येत नसे. आता जगात स-अक्षरता प्रचंड वाढली. आणि ज्ञानाचा स्फ़ोटच झाला असं म्हणता येईल. विसाव्या शतकाच्या अंतापर्यंत ६०-७० टक्के लोक साक्षर झाले. १९०० साली जगात दहा लाख लोकांनासुद्धा लिहितावाचता येत असेल नसेल. एका गांवात एक शिकलेला माणूस असे किंवा नसे. आता सुमारे ४०० कोटी लोक लिहू वाचू शकतात. हा एक चमत्कारच झाला. हा चमत्कार छपाईच्यामुळे, शिक्षण सार्वत्रिक झाल्यामुळे झाला.

पण इंटरनेट आलं आणि हा स्फ़ोट हा लवंगी फ़टाक्याचा आवाज वाटावा अशी महाप्रचंड क्रांती ज्ञानाच्या जगात झाली. आजवरच्या साहित्याची संकल्पनाच इंटरनेटने बदलून टाकली. म्हणजे कविता किंवा कथा त्याच राहिल्या. पण त्यांचा वेग बदलला. वाचक बदलले. आवाका बदलला. मूळात लेखकही बदलले. इंटरनॅटवर कोणीही लिहू शकतो. स्वतःचा ब्लॉग बनवू शकतो. स्वतःचं पुस्तक प्रकाशित करू शकतो. त्याचा खर्च अगदीच नगण्य असतो. किंमत कमी असल्यामुळे त्याची व्याप्ती खूप जास्त असते. प्रसाराचा वेग खुपच जास्त असतो. पुस्तक लिहिणं, छापणं, पाठवणं, विकणं या सर्व प्रक्रियेत वर्ष वर्ष लागायचं. पण ई साहित्य आता बनतं आणि लगेच प्रसारित होतं. हा परिणाम एकूण निर्मितीच्या क्वांटिटीला पोषक आहे. त्यामुळे स्पर्धा वाढणं आलं. आणि त्यातून क्वालिटीला पोषक वातावरण तयार होईल याची खात्री आपण बाळगू शकतो.

त्यामुळे ई साहित्य हे खालील पाच गुणांनी वेगळं असतं

१) निर्मिती आणि प्रसाराचा वेग जास्त

२) निर्मिती आणि वितरणाचा खर्च कमी

३) वाचकांच्या प्रतिक्रियांचा वेग आणि ओघ जास्त

४) निर्मितीला चित्र वा ध्वनीच्या आधाराने अधिक सजवणं शक्य

५) टिकाऊपण : एकदा ई साहित्य बनलं की ते नष्ट होण्याची शक्यता नाही. आज लिहीलेलं आणि पोस्ट केलेलं ब्लॉगवरचं साहित्य पाचशे हजार वर्षं तसंच राहण्याची शक्यता आहे.

## इंटरनेट साहित्यामुळे होणारे बदल

पहिला बदल हा : आजवर साहित्यनिर्मिती ही कागदावर आणि एकाच लेखकाने किंवा कवीने करायची गोष्ट होती. ते केवळ त्याच्या मेंदूतले व्यवहार होते. मात्र आता एकाच वेळी एकाच विषयावर अनेक लेखक एकत्रितपणे लिहू शकतात. एकमेकांच्या लिखाणात भर घालू शकतात. सहनिर्मिती होऊ शकते. दोघांनी एकत्र साहित्य निर्मिती करणं म्हणजे तिघांनी विवाहबद्ध होऊन मूल जन्माला घालण्यासरखं आहे असं मार्क ट्वेन विनोदाने म्हणाले होते. पण आता हे सहज शक्य आहे ( मी हे साहित्य निर्मितीबद्दल म्हणतोय. तसं सरोगेट मदर मुळे किंवा टेस्ट ट्युब बेबी मुळे दुसरंही शक्य झालंय). आता लेखकांचा एक ग्रुप जगाच्या दहा कोपर्‍यांत बसून एकत्रित लिखाण करू शकतात.

दुसरा गुणात्मक बदल हा की आता लिखाण मल्टीमिडिया पातळीवर होऊ शकतं. म्हणजे तुम्ही ई बुक वाचत असताना मागे अनुषंगिक संगीत आणि बाजूला तदनुषंगिक चित्रं असू शकतात. इतकंच नव्हे तर लेखकाच्या , कवीच्या किंवा अन्य कुणाच्या आवाजात ते लिखाण वाचलेलं ऐकू येऊ शकतं. पुस्तक तुमच्याशी बोलू शकतं. एखादा सिनेमा पहावा तसाच हा अनुभव. पण वाचकाची क्रिएटीव्हिटी जागी ठेवणारा.

तिसरा गुणात्मक बदल हा की जसं पुस्तक वाचकाशी बोलू शकतं तसं वाचकही पुस्तकाशी बोलू शकेल. म्हणजे वाचक पुस्तकाने कसं आणि कुठे वळावं , कथानक कसं बदलावं याच्या सूचना देऊ शकेल . एखादा कॉम्प्युटर गेम असावा तसं. याला इंटरऍक्टिव्ह फ़िक्शन (IF) म्हणतात. यातून वाचकाला स्वतःच्या क्रिएटिव्हिटीचा आणि पुस्तकाला वाचकाच्या वृत्तीचा अनुभव येऊ शकतो. अशा प्रकारचं एक मराठी IF लवकरच ई साहित्य प्रतिष्ठान तर्फ़े येतं आहे. हे पुस्तक वाचक शंभरवेळा शंभर रितींनी वाचू शकेल.

चौथा आणि अत्यंत महत्त्वाचा गुणात्मक ( काहींना हा अवगुणात्मक वाटेल) बदल हा की आता कोणीही (आणि काहिही) लिहू आणि प्रसिद्ध करू शकेल. एखाद्या खेड्यातला डोंगरकपारीतला कवी किंवा अंगोलातला एखादा मराठी माणूस. आणि त्याचं लिखाण लोकांना आवडूही लागेल. त्याच्या ब्लॉगला गर्दी होऊ लागेल. एकूणच लेखक आणि वाचक यांच्यातली प्रकाशक, मुद्रक, वितरक, विक्रेते वगैरेंची साखळी नाहीशी होईल. यातून जशी फ़ालतू कचरा निर्माण होण्याची भिती आहे , तशीच नवनवीन प्रयोग आणि आतापर्यंत मराठी किंवा जागतिक साहित्यात न उमटलेली अज्ञात जीवनांची प्रतिबिंबं दिसण्याची आशाही निर्माण झाली आहे. अत्यंत हिडीस अश्लील साहित्य बनू शकेल तसेच साहित्यनिर्मितीच्या व्यवहारातली मक्तेदारी नाहीशी होऊन नवीन जीवनप्रवाह साहित्यात येतील. सध्याचा मोबाईलचा प्रसार पहाता हे अशक्य नाही. याचे चांगले आणि वाईट परिणाम असतीलच. पण याने सगळं साहित्य विश्व ढवळून निघणार हे नक्की. तसंही राजघराण्यांच्या ऐवजी सर्वसामान्यांच्या हाती सत्ता गेल्यानंतर त्याचे बरे आणि वाईट परिणाम झाले. पण म्हणून कोणी मागे जाऊ शकले नाही. जसा लोकशाहीला आता पर्याय नाही तसा ई साहित्याला पर्याय नसेल. माघार नसेल.

याचा असा मात्र अर्थ नाही की एकदा का ई माध्यम आले की प्रिंट माध्यम नाहीसे होणार. सिनेमा आल्यामुळे नाटक संपले नाही. किंवा टिव्हीवर चौवीस तास न्युज चॅनेल आल्याने वर्तमान पत्रं बंद झाली नाहीत. साध्या पुस्तकांचं राज्य काही खालसा वगैरे होणार नाही. कदाचित त्यांचा सुवर्णकाळ आताच खरा सुरू होईल. ई बुक्स आणि प्रिंट बुक्स यांच्यातला संवाद अधिक दृढ होऊन दोघांचंही भलं होऊ शकतं. सध्या तरी जगभरातल्या ई चळवळीतून हेच दिसतं आहे.

कारण टॅब्लेटमुळे पुस्तकाची संकल्पना मुळातूनच बदलणार आहे. पुस्तकांसाठी जंगलतोड करणं यापुढे कायमचं बंद होऊ शकेल अशी परिस्थिती येऊ घातली आहे.

> आज ई साहित्य हे नवीन आहे. त्यात आजवरच्या इतर सर्व शोधांप्रमाणे फ़ायदे आहेत तसे तोटेही आहेत. पण ई साहित्याला पुढच्या काळात फ़ार मोठे स्थान असणार आहे यात मात्र शंका नाही.